जा.क्र १०६/पोउआ/अभि/अपील/२०१७
पोलीस उप आयुक्त (अभियान) यांचे
कार्यालय, डॉ.डी.एन रोड, पोलीस
आयुक्तालय, फोर्ट, मुंबई—४०० ००१.
दुरध्वनी क्रमांक :— २२६५८१८(कार्यालय)

दिनांक — २१/०१/२०१७

प्रति,

शासकीय माहीती अधिकारी,
तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
बिनतारी संदेश मुख्यालय, मुंबई,
मुंबई.

**विषय** :— शासनाचा माहितीचा अधिकार, अधिनियम २००५ अन्वये
श्री. **सुशिल कमबमपती** यांचा दि. **०९.१२.२०१६** रोजीचा अपील अर्ज.

**संदर्भ** :— १. जा.क्र.**९९३**/सपोआ/समन्वय/माहीती/१६, दि. **२२.१२.२०१६**
२. जा.क्र.२५/सपोआ/बि.स.नि.क./१७, दि. **०७.०१.२०१७**

उपरोक्त विषयान्वये केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती मिळण्यासाठी श्री. **सुशिल कमबमपती**, यांचा दि. **०९.१२.१६** रोजीचा अपील अर्ज, या कार्यालयास दि. **१७.०१.२०१७** रोजी प्राप्त झाला आहे.

प्रस्तुत प्रकरणी आपण संदर्भ २ च्या अनुषंगाने, सहाय्यक पोलीस आयुक्त, बि.सं. नियंत्रण कक्ष, मुंबई, यांनी सदरची कार्यवाही त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नसल्याने, कळविल्याने, या कार्यालयाकडून सदर माहीती पाठविण्यात यावी असे कळविण्यात आले आहे. या अनुषंगाने कळविण्यात येते की, मुख्य नियंत्रण कक्ष तसेच बिनतारी संदेश विभाग कार्यालयाचे आस्थापना विषयक कामकाज हे पोलीस उप आयुक्त, बिनतारी संदेश विभाग, कार्यालयाकडून केले जात असून, पो.प.प.क्र.३१/२०१३, भाग—३, दि. ०२/०२/२०१३ अन्वये बिनतारी संदेश विभाग कार्यालयाकरीता सहाय्यक पोलीस आयुक्त—१, बिनतारी संदेश विभाग, मुंबई, यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तसेच, अर्जदार यांची मुख्य नियंत्रण कक्षाशी संबंधित माहीती, सहाय्यक पोलीस आयुक्त (समन्वय) तथा जन माहीती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, यांनी त्यांचे अभिलेखावर उपलब्ध नसल्याने, पुरविता येत नाही असे संदर्भ क्र. १ अन्वये कळविले आहे. बिनतारी संदेश विभागाकरीता पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून स्वतंत्र ''पोलीस उप आयुक्त/सहाय्यक पोलीस आयुक्त'', यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे अधिपत्याखालील ''पोलीस उप आयुक्त'' हे अपीलीय अधिकारी आहेत. तरी बिनतारी संदेश विभागाच्या पर्यवेक्षकीय अधिकारी यांचेकडून आवश्यक माहीती प्राप्त करावी व अर्जदार यांना देय असल्यास पूरविण्यात यावी. बिनतारी संदेश विभागाच्या माहीतीबाबत या कार्यालयाकडून विचारणा करण्यात येऊ नये.

**सोबत :— ०१ ते ०९ सहपत्रे.**

( अशोक दुधे )
पोलीस उप आयुक्त (अभियान)
व अपिलीय अधिकारी, मुंबई.

कृ.मा.प.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी** :—

१) **श्री. सुशिल कमबमपती, व्हाईन रॅन कन्टेन्ट ॲन्ड सर्व्हीसेस, ZGM6D2FV-10, सहावा मजला, ते.एस.डी.रिजेन्ट स्केअर, एम.जी.रोड, गुरगाव—१२२००२.**

आपला दिनांक **०९.१२.२०१६** रोजीचा माहीतीचा अधिकार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असून, सदर माहीतीचा अधिकार अर्ज पुढील परस्पर कार्यवाहीसाठी, शासकीय माहीती अधिकारी, तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश मुख्यालय, मुंबई, यांचे कार्यालयास पाठविण्यात आला आहे. कृपया आपण सदर कार्यालयाशी संपर्क करावा.

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, बिनतारी संदेश विभाग मुंबई.

३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (समन्वय), मुंबई.

४) सहाय्यक पोलीस आयुक्त, मुख्य नियंत्रण कक्ष, मुंबई.